# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** नागपूर शहरातील नाईक तलाव पुनरुज्जिवन प्रकल्पास महाराष्ट्र
**{सा.आ.अभि.विभाग}** शासनाने शासन निर्णय क्र. अमृत – २०२२/प्र. क्र.२६८ / नवि-३३ नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई दि. ०२ नोव्हेंबर २०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. "केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या नाईक सरोवर पुनरुज्जिवन प्रकल्पाच्या रु. १२.९५ कोटी चा प्रस्तावास शासनाकडुन मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार केन्द्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या २५%) रु. ३.२४ कोटी, राज्य शासन अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या २५%) रु. ३.२४ कोटी महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे आणि नागपूर महानगरपालिकेचा हिस्सा (प्रकल्प किंमतीच्या ५०%) रु. ६.४८ कोटी आहे. नाईक तलाव पुनरुज्जिवन प्रकल्पाच्या अंतर्गत करावयाच्या कामाकरिता विभागाने निविदा मागविल्या असता प्राप्त निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. एस. एस. पाटील ॲन्ड कं. यांची प्राकलनिय दरापेक्षा (रु. १२,९५,८८,३५८/-) २१.७० टक्के प्रमाणे कमी दराची रु. ८,४७,६७,९०९/- निविदा विभागास प्राप्त झाली आहे. या कामावर निविदाकाराचा देकार रु. ८,४७,६७,९०९/- + जी.एस.टी. रु. १,५२,५८,२२४/- असे एकुण रु. १०,००,२६,१३३/- ची निविदा मंजूरीचा तसेच मनपाच्या हिस्स्याची (५०%) रक्कमेची तरतूद करण्याचा प्रश्न विचारात घेणे.

टीप :- सविस्तर टिपणी नस्तीमध्ये संलग्न आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :- 259/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 14/02/2023**

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कार्यकारी अभियंता (पर्यावरण), सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी विभाग, यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार नागपूर शहरातील नाईक तलाव पुनरुज्जिवन प्रकल्पास महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र. अमृत – २०२२/प्र. क्र.२६८ / नवि-३३ नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई दि. ०२ नोव्हेंबर २०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. "केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत नागपूर महानगरपालिकेच्या नाईक सरोवर पुनरुज्जिवन प्रकल्पाच्या रु. १२.९५ कोटी चा प्रस्तावास शासनाकडुन मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार केन्द्र शासनामार्फत अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या २५%) रु. ३.२४ कोटी, राज्य शासन अनुज्ञेय अनुदान (प्रकल्प किंमतीच्या २५%) रु. ३.२४ कोटी महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे आणि नागपूर महानगरपालिकेचा हिस्सा (प्रकल्प किंमतीच्या ५०%) रु. ६.४८ कोटी आहे. नाईक तलाव पुनरुज्जिवन प्रकल्पाच्या अंतर्गत करावयाच्या कामाकरिता विभागाने निविदा मागविल्या असता प्राप्त निविदापैकी निम्नतम निविदाकार मे. एस. एस. पाटील ॲन्ड कं. यांची प्राकलनिय दरापेक्षा (रु. १२,९५,८८,३५८/-) २१.७० टक्के प्रमाणे कमी दराची रु. ८,४७,६७,९०९/- निविदा विभागास प्राप्त झाली आहे. या कामावर निविदाकाराचा देकार रु. ८,४७,६७,९०९/- + जी.एस.टी. रु. १,५२,५८,२२४/- असे एकुण रु. १०,००,२६,१३३/- ची निविदा मंजूरीचा तसेच मनपाच्या हिस्स्याची (५०%) रक्कमेची तरतूद करण्याच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**
**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**
**प्रशासक**
**नागपूर महानगरपालिका, नागपूर**